महाराष्ट्र शासन

**अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई**

लेखा कोष भवन, ए विंग, वांद्रे - कुर्ला संकुल,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१
टेलीफोन क्र. २६५६६३२९/३३०

## : ई-लिलाव नोटीस:

अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई कार्यालयातील जुनी रद्दी अधिदान व लेखा कार्यालय, वांद्रे (पूर्व), मुंबई ,अधिदान व लेखा कार्यालय, जुने अभिलेख कक्ष एपिजे हाऊस, ७ वा मजला दिनशॉ वाच्छा रोड केसी कॉलेजच्या बाजूला, चर्चगेट मुंबई व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ४ था मजला सिडको भवन दक्षिण कक्ष, बेलापूर, नवी मुंबई येथून उचलण्यासाठी ई-लिलाव पध्दतीने विक्री करावयाची आहे.

सदर ई-लिलावाबाबत सविस्तर अटी व शर्ती व संपूर्ण माहिती शासनाच्या **eauction.gov.in** या संकेतस्थळावर दि.१९/०१/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

| **ई-लिलाव प्रक्रियेचा तपशील** | | |
|---|---|---|
| | दिनांक | वेळ |
| १.निविदा प्रसिध्दीचा दिनांक | १९/०१/२०२६ | सकाळी १०:०० पासून |
| २. निविदा फॉर्म कागदपत्रे सादर करणे/धनाकर्ष स्विकारण्याचा दिनांक | १९/०१/२०२६ | सकाळी १०:०० पासून |
| ३. निविदा फॉर्म कागदपत्रे सादर करणे/धनाकर्ष स्विकारण्याचा शेवटचा दिनांक | २७/०१/२०२६ | सायंकाळी ०५:३० पर्यंत |
| ४.प्राप्त निविदा फॉर्म कागदपत्रे /धनाकर्ष रक्कम मंजूरी देण्याची प्रक्रीया सूरू करण्याचा दिनांक | २८/०१/२०२६ | सकाळी १०:३० पासून |
| ५. .प्राप्त निविदा फॉर्म कागदपत्रे /धनाकर्ष रक्कम मंजूरी देण्याचा शेवटचा दिनांक | २९/०१/२०२६ | सायंकाळी ०८:०० पर्यंत |
| ६. लिलाव सुरु व बंद करण्याचा दिनांक | ३०/०१/२०२६ | सकाळी १०:०० पासून<br>दुपारी ०१:३० पर्यंत |

कोणतीही ई-लिलाव बोली अथवा सर्व ई-लिलाव बोली कोणतेही कारण न देता स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा तसेच ई-लिलाव याची कार्यवाही कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचा अधिकार मा. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांनी राखुन ठेवला आहे. ज्या संस्थाना ई-लिलावाबाबत या कार्यालयाच्या सर्व अटी व शर्ती मान्य असतील अशाच संस्थांनी ई-लिलावामध्ये भाग घ्यावयाचा आहे.

-सही-

(विलास गांगुर्डे)
अधिदान व लेखा अधिकारी

E:\control sec\MANGESH KADAM/E-TENDER FORM 2022

# ई-लिलाव अटी व शर्ती

१. रद्दी उचलण्याची (ई-लिलाव) लिलाव प्रक्रिया संगणकावर ऑनलाईन पध्दतीने करणेत येईल या ई-लिलावा संबंधित सर्व माहिती सूचना व शुध्दीपत्रके इत्यादी ई- लिलाव प्रणालीद्वारे ऑनलाईन (**eauction.gov.in**) वर प्रसिध्द करणेत येतील. (धनादेश अभिलेखे वगळून)

२. सदर रद्दी अधिदान व लेखा कार्यालय, लेखाकोष भवन, बांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रे पुर्व-४०००५१, अधिदान व लेखा कार्यालय, द्वारा जुने अभिलेख कक्ष, एपिजे हाऊस, ७ वा मजला दिनशॉ वाच्छा रोड केसी कॉलेजच्या बाजूला, चर्चगेट मुंबई ४०००२०, अधिदान व लेखा कार्यालय, द्वारा जुने अभिलेख कक्ष महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ४ था मजला सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४ येथे ठेवण्यात आलेली आहे. दि१९/०१/२०२६ ते दि.२७/०१/२०२६ पर्यंत दररोज सकाळी ११.०० ते दुपारी ४.३० वाजेपर्यंत त्याची प्रत्यक्ष पाहणी करून प्रति कि.ग्रॅ.चे जास्तीत जास्त दर नमूद करावेत, नंतर कोणतीही तक्रार आणि सबब स्वीकारली जाणार नाही.

३. लिलाव प्रक्रीयेत भाग घेणारी संस्था मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) परिक्षेत्रातील असणे आवश्यक आहे. MMRDA परिक्षेत्रा बाहेरील संस्थेने ई-लिलाव प्रक्रीयेत भाग घेतल्यास निविदा स्वीकृत केल्या जाणार नाहीत.

४. कार्यालयातील रद्दीची प्रारंभिक अंदाजित बोली प्रति कि.ग्रॅ. रक्कम रु.१२/- इतकी आहे सदर रकमेवर वाढीव बोली रक्कम रु.१/- प्रति कि.ग्रॅ. च्या पटीत असेल.(वाढीव बोली रकमेत फेरबदल करावयाचे अधिकार या कार्यालयाने राखून ठेवले आहे.)

५. सदर निविदा कोरे नमुना शुल्क रु.१९००/- इतकी आहे. सदर रकमेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) ASSISTANT PAY AND ACCOUNTS OFFICER या नावाने दि.१९/०१/२०२६ ते दि.२७/०१/२०२६ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत बांद्रे येथील कार्यालयात जमा करावयाचा आहे. सदर शुल्क ना-परतावा असून निविदा फॉर्म **eauction.gov.in** या संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येईल.

६. इसारा रक्कम (EMD) रु.९५००/- इतकी असून सदर रकमेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) ASSISTANT PAY AND ACCOUNTS OFFICER या नावाने या कार्यालयात दि.१९/०१/२०२६ ते दि२७/०१/२०२६ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत जमा करण्यात यावा.

७. खालील कागदपत्रे **eauction.gov.in** या संकेतस्थळावर दि.१९/०१/२०२६ ते दि२७/०१/२०२६ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत online पध्दतीने upload करणे अनिवार्य आहे.

**१.निविदा नमुना प्रपत्र 'अ '.**
**२. पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र.**
**३. ASSESSMENT YEAR २०२५-२६ साठी आयकर विवरणपत्र**
**४. वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र**
**५. दुकाने व आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र. (केवळ MMRDA परिक्षेत्रातील)**
**६. ई-लिलाव अटी व शर्तीच्या प्रतीवर साक्षांकित करण्यात यावे. (सही व शिक्यानिशी).**

वरील १ ते ६ कागदपत्रांची मुद्रित स्वरूपातील (print) प्रत साक्षांकित करून दि. २७/०१/२०२६ पर्यंत बांद्रे येथील कार्यालयात जमा करणे आवश्यक राहील. जर एखादी संस्था कागदपत्रे online upload करु शकला नाही किंवा **eauction** वर online लिलाव प्रक्रियेत येऊ शकला नाही तसेच MMRDA परिक्षेत्राच्या बाहेरील संस्थने **eauction** मध्ये भाग घेतल्यास त्यांची निविदा स्वीकृत केली जाणार नाही. व कोणत्याही परिस्थितीत निविदा शुल्क परत केले जाणार नाही व कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

८. ज्या संस्थेस ई-लिलावाचा ठेका देण्यात येईल, त्या संस्थेने विक्री करण्यात येणारे रद्दी पेपरचा कुठल्याही प्रकारे गैरवापर करण्यात येणार नसल्याचे हमीपत्र दयावे व सुरक्षा ठेव म्हणून रु. ३०,०००/- चा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) ASSISTANT PAY AND ACCOUNTS OFFICER या नावाने या कार्यालयात कार्यादेश दिल्यापासून २ दिवसांच्या आत हमीपत्र व धनाकर्ष जमा करणे अनिवार्य आहे. जर ठेकेदार सुरक्षा ठेव रक्कम कार्यालयाकडे वेळेत जमा करण्यास असमर्थ ठरल्यास त्याचा ठेका रद्द करून त्याची इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.

९. रद्दी प्रत्यक्ष ताब्यात घेणेपुर्वी कंत्राटदाराने रद्दी वाहतुक करण्यात येणारे Empty वाहनाचे वजन Weighing scale वर करणे आवश्यक आहे. तसेच रद्दीच्या सर्व गोणी वाहनामध्ये भरल्यानंतर त्याचे त्याच (Weighing scale) वजन काटयावर करणे आवश्यक आहे व दोन्ही वेळच्या वजनाच्या मुळ पावत्या कार्यालयाकडे जमा करणे आवश्यक राहील. तसेच empty वाहनाचे वजन करतेवेळी आणि वाहनात रद्दी भरल्यानंतर वाहनाचे वजन करतेवेळी अशा दोन्ही वेळेस अधिदान व लेखा कार्यालयाचे दोन कर्मचारी प्रत्यक्ष उपस्थित राहतील व त्यांचे निरीक्षणाखाली दोन्ही वेळचे वजनाची पडताळणी करण्यात येईल. व त्यानुसार रददीचे पैसे कार्यालयाकडे आगाऊ जमा केल्यानंतरच रद्दी कंत्राटदारास सुपुर्त करणेत येईल.

१०. सदर या रद्दीसोबत आदाता नोंदणी प्रमाणपत्र, वांद्रे व चर्चगेट येथील पत्त्यावर हे अभिलेखे पेपर मशीनवर (Paper Shreder Machine) वर तूकडे करून स्वतंत्र गोणीत भरावी लागेल व कोणत्याही परिस्थितीत एकत्र अखंड कागद कार्यालयाच्या बाहेर नेता येणार नाही.

११. ज्या संस्थेची ई-लिलाव बोली प्रति कि.ग्रॅ. चे दर इतर संस्थांपेक्षा सर्वात जास्त असेल अशाच संस्थेस रद्दीची विक्री करण्यात येईल. नियुक्त संस्थेने वजन केलेली रद्दी उचलण्यापुर्वी रद्दीची आगाऊ रक्कम रोखीने/धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) द्वारे या कार्यालयात जमा करणे अनिवार्य आहे.

१२. जुने रद्दी जेथे आहे त्यास्थितीत अटी व शर्तीच्या अधीन राहून फाडल्यानंतरच उचलावी लागेल. सदर जुन्या रद्दीमध्ये नस्तीसाठी वापरण्यात येणारे पुठ्ठे व झाडलोटीच्या कचऱ्यातील कागदांचा समावेश असल्यामुळे सदर रद्दी आहे त्या अवस्थेत फाडून उचलावी लागेल. रद्दी फाडल्यामुळे कार्यालयाच्या जागेत होणारा केरकचरा संपूर्णपणे उचलून जागेची स्वच्छता करून देणे बंधनकारक आहे

१३. तसेच रद्दी उचलताना सुतळी, गोणी व तत्सम सर्व प्रकारचे साहीत्य, Paper Shreder Machine, मजुरांची व्यवस्था तसेच रद्दीच्या वाहतूकीचा सर्व प्रकारचा संपूर्ण खर्च ठेकेदारास स्वखर्चाने करावा लागेल.

१४. ठेका मंजूर केलेल्या संस्थेने रद्दी फाडण्याचे काम कार्यालयीन वेळेत म्हणजे सकाळी ९.४५ ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत साप्ताहिक/ सार्वजनिक सुटया वगळून कामकाजाच्या दिवशी करावयाचे आहे.

१५. विक्री करण्यात आलेली रद्दी पेपरचा पेपर मिलमध्ये लगदा केल्याचे प्रमाणपत्र जमा करावे लागेल. अन्यथा इसारा रक्कम व सुरक्षा रक्कम जप्त करण्यात येईल.

१६. ज्या संस्थेस रद्दी विक्रीचा ठेका देण्यात आला त्या संस्थेच्या कर्मचाऱ्यास/मजूरास अधिदान व लेखा कार्यालयात/जुने अभिलेख कक्षात काम करताना दगावल्यास/कोणत्याही स्वरूपाची गंभीर स्वरूपाची ईजा झाल्यामुळे तात्पुरते/कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास त्याच्या उपचाराचे/भरपाईचे कोणतेही दायित्व अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई/महाराष्ट्र शासन यांचे असणार नाही याची उपचार/भरपाईची सर्वस्वी जबाबदारी ठेका घेणाऱ्या संस्थेची राहील.

१७. रद्दी पेपर नेताना कार्यालयाच्या इमारतीचे/आवारातील कोणत्याही साहित्याचे कुठल्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई ठेकेदारांकडुन त्याच ठिकाणी (On the Spot) रोखीच्या स्वरूपात वसूल करण्यात येईल व याबाबत ठेकेदारास बाजू मांडण्याची कोणतीही संधी दिली जाणार नाही.

१८. कोणतेही दर मंजूर वा रद्द करणे तसेच रद्दी विक्रीची कार्यवाही कोणत्याही स्तरावर थांबविणे हे कार्यालयाचे हक्क अबाधित राहतील तसेच याबाबत कोणतीही कारणमिमांसा केली जाणार नाही.

***अधिदान व लेखा कार्यालयाची जुनी रद्दी उचलण्याबाबत ठेक्याच्या ई-लिलावात नमूद केलेल्या वरील सर्व अटी/शर्ती मला संपूर्णपणे तसेच बिनशर्तपणे मान्य आहेत. तसेच सदर अटी आणि शर्तीबाबत माझी कोणतीही तक्रार किंवा हरकत असणार नाही.**

नाव ------------------------------------------ स्वाक्षरी व संस्थेचा रबरी शिक्का -------------------

महाराष्ट्र शासन

अधिदान व लेखा कार्यालय

वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व), मुंबई ४०००५१.

## कोरे नमुन्याचे शुल्क रु. ११००/- (सदर शुल्क ना-परतावा आहे)

अधिदान व लेखा कार्यालय वांद्रे (पुर्व), मुंबई, जुने अभिलेख कक्ष, चर्चगेट मुंबई व बेलापूर, नवी मुंबई येथील जुनी रद्दी उचलण्याबाबत ठेक्या करीता ई-लिलाव पध्दतीतील विहीत नमुना.

**प्रपत्र - 'अ'**

| | | | |
|---|---|---|---|
| ठेकेदाराचे संपूर्ण नाव | | | |
| कार्यालयाचा संपूर्ण पत्ता व Mobile क्रमांक व E-mail ID | | | |
| रद्दीच्या कामाचा पुर्वानुभवाचे तपशिल (यापुर्वी काम केलेल्या/करत असलेल्या संस्थांचे प्रमाणपत्र जोडावे). | | | |
| दुकाने आणि आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र **(केवळ MMRDA परिक्षेत्रातील)** | | | |
| वस्तू व सेवा कर नोंदणी क्र. | | | |
| ASSESSMENT YEAR २०२५-२६ साठी आयकर विवरणपत्र | | | |
| ई-लिलाव सुचनेतील अटीनुसार निविदा नमुना शुल्क व इसारा रक्कमेच्या धनाकर्षाचा तपशील | बँकेचे नाव | धनाकर्ष क्र. व दि. | रक्कम |

अधिदान व लेखा कार्यालयाची जुनी रद्दी उचलण्याबाबत ठेक्याचा ई-लिलाव सूचनेत नमूद केलेल्या सर्व अटी/शर्ती मला मान्य आहेत. तसेच याबाबत माझी कोणतीही तक्रार नाही. प्रपत्र अ-मध्ये नमुद केलेली सर्व माहिती सत्य आहे.

नाव ------------------------------------------ ठेकेदाराची स्वाक्षरी ------------------

(संस्थेच्या कार्यालयाचा रबरी शिक्का पदनाम व संपुर्ण पत्यासहीत)

E:\control sec\MANGESH KADAM/E-TENDER FORM 2022

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**

# अधिदान व लेखा कार्यालय

लेखा कोष भवन, ए विंग वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

क्र.अलेका/नियंत्रण२/व्यवस्थापन३/न.क्र. १८/प्रदानती धनादेश अ.न./क्र.९७ दिनांक १३/०१/२०२६

## रद्दी विक्रीची सुचना

अधिदान व लेखा कार्यालय, द्वारा जुने अभिलेख कक्ष महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,४ था मजला, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ येथील जुने प्रदानित धनादेश अभिलेखे पेपर मशीनवर (Paper Shreder Machine) वर तुकडे करून विक्री करावयाचे आहेत. सदर अभिलेख विक्री करण्यात येणारी संस्था मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) परिक्षेत्रातील असणे आवश्यक राहील. ईच्छुक संस्थांनी दिनांक ३०/०१/२०२६ ते दिनांक ०५/०२/२०२६ दुपारी ४.०० वाजेपर्यंत मोहोरबंद लिफाफ्यातून दरपत्रक सादर करावे. जास्तीत जास्त दर देणाऱ्या संस्थेचे दर मान्य करण्यात येतील. उपरोक्त जुने प्रदानित धनादेश अभिलेख दि. ३०/०१/२०२६ ते दि. ०५/०२/२०२६ पर्यंत सकाळी ११.०० ते सायंकाळी ४.०० या वेळेत पाहता येतील. दि.०६/०२/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता अधिदान व लेखा अधिकारी यांच्या दालनात दरपत्रके उघडण्यात येतील.

ज्या संस्थांना रद्दी पेपर विक्रीबाबत खालील नमुद अटी व शर्ती मंजूर असतील अशा संस्थांनीच आपली दरपत्रके मोहोरबंद पाकीटातून अधिदान व लेखा कार्यालय, लेखा-कोष भवन, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे पुर्व, मुंबई ४०००५१. या पत्यावर दिनांक ३०/०१/२०२६ ते दिनांक ०५/०२/२०२६ पर्यंत पाठवावे व लिफाफ्यावर **धनादेश अभिलेख विक्री करीता दरपत्रक नियंत्रण शाखा** असे ठळकपणे लिहावे.

## अटी व शर्ती

सदर जुने धनादेश अभिलेखे रद्दी अधिदान व लेखा कार्यालय, द्वारा जुने अभिलेख कक्ष महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ४ था मजला, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ येथे असून धनादेश अभिलेखे विक्रीचे खालीलप्रमाणे अटी व शर्ती मंजूर असतील अशा संस्थांनी त्यांचे दरपत्रक मोहोरबंद लिफाफ्यातून वांद्रे कार्यालयाच्या उपरोक्त पत्यावर द्यावे.

१. दरपत्रके सादर करणारी संस्था मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) परिक्षेत्रातील असणे आवश्यक राहील.
२. रद्दी पेपरचे प्रति किलो ग्रॅम जास्तीत जास्त दर देणाऱ्या संस्थेचे दरपत्रक मान्य करण्यात येईल व ठेका देण्यात आलेल्या संस्थेने धनादेश अभिलेखे रद्दी पेपरचा कुठल्याही प्रकारे गैरवापर करण्यात येणार नसल्याचे हमीपत्र द्यावे व अधिदान व लेखा कार्यालयाकडे रु.५,०००/- इतकी आगाऊ रक्कम रोखीच्या स्वरूपात जमा करणे आवश्यक आहे. सदर रक्कम रद्दी विक्रीमध्ये समायोजित केली जाईल.

३. सदर पत्र मिळाल्यापासून २ दिवसांच्या आत हमीपत्र व रोख रक्कम या कार्यालयाच्या रोखपालाकडे न चुकता भरणा करावा अन्यथा सदर ठेका घेण्यास आपण असमर्थ आहात असे समजून दुसऱ्या ठेकेदाराची निवड केली जाईल.

४. धनादेश अभिलेखे पेपर मशीनवर (Paper Shreder Machine) वर तुकडे करून स्वतंत्र गोणीत भरावे लागतील व कोणत्याही परिस्थितीत एकत्र अखंड कागद कार्यालयाच्या बाहेर नेता येणार नाही. रद्दी उचलताना सुतळ, गोणी, Paper Shreder Machine व इतर तत्सम साहित्य, मजुरांची व्यवस्था तसेच रद्दीच्या वाहतुकीचा सर्व प्रकारचा खर्च ठेकेदारास स्वखर्चाने करावा लागेल.

५. रद्दीचे वजन अधिदान व लेखा कार्यालयाच्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या समोर करणे अनिवार्य आहे. तसेच संस्थेकडील वजनकाटयाचे निरीक्षण या कार्यालयाकडून करण्यात येईल, याची आवर्जून नोंद घ्यावी.

६. रद्दी विक्रीची कार्यवाही पार पाडणेकरीता अधिदान व लेखा कार्यालयातील नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांनी रद्दीचे वजनाची पडताळणी केल्यानुसार जे प्रत्यक्ष वजन भरेल त्यानुसार रद्दीच्या वजनाची कार्यालयाकडे आगाऊ रक्कम जमा केल्यानंतरच रद्दी उचलण्यास परवानगी देण्यात येईल.

७. ज्या संस्थेस रद्दी विक्रीचा ठेका देण्यात आला आहे त्या संस्थेच्या कर्मचाऱ्यास मजुरास अधिदान व लेखा कार्यालयात / जुने अभिलेख कक्षात काम करताना दगावल्यास / कोणत्याही स्वरुपाची गंभीर इजा झाल्यामुळे तात्पुरते / कायमस्वरुपी अपंगत्व आल्यास त्याच्या उपचाराचे / भरपाईचे कोणतेही दायित्व अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / महाराष्ट्र शासन यांचे असणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी ठेका देण्यात आलेल्या संस्थेची राहील याची नोंद घ्यावी.

८. रद्दी पेपर नेताना कार्यालयाच्या इमारतीचे/ आवारातील वस्तूंचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई ठेकेदारांकडून त्याच ठिकाणी (On The Spot) रोखीच्या स्वरूपात वसूल करण्यात येईल.

९. रद्दी फाडल्यामुळे कार्यालयाच्या जागेत होणारा केरकचरा संपूर्णपणे उचलून जागेची स्वच्छता करून देणे संस्थेस बंधनकारक आहे, याची आवर्जून नोंद घ्यावी.

कोणतेही दर मंजूर वा रद्द करणे तसेच रद्दी विक्रीची कार्यवाही कोणत्याही स्तरावर थांबविणे हे कार्यालयाचे हक्क अबाधित राहतील तसेच याबाबत कोणतीही कारणमिमांसा केली जाणार नाही.

(वि.ग.गांगुर्डे)
अधिदान व लेखा अधिकारी